# जाहीर प्रसिध्दीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडुन वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार पुरविण्याच्या दृष्टीकोणातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश करण्यामागे दिनांक 28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमाअंतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपंचायत या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा - सुविधापैकी नागरिक केंद्रबिंदू मानून नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत. अशा सेवा अध्यादेशाच्या कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अएसीओ-2015/प्र.क्र.189/नवि14, दिनांक 23/06/2015 नुसार मा.शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकुण 70 सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम 3(अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश , 2015 कलम 3 अन्वये अधिसूचित करावयाच्या एकुण 70 लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी यांची यादी विवरणपत्र 01 अन्वये सोबत जोडली आहे.

स्वा:-
(अभिजीत किरण सोनवणे )
मुख्याधिकारी
नगरपंचायत,भामरागड